सर्वे सुखिन: सन्तु

पुष्पक

को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

रजि नंबर : (बी.ओ.एम./डब्ल्यु.एस./आर.एस.आर./सी.आर./८३७४/दि.३१/१२/९८)

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष

२७वा वार्षिक अहवाल २०२४-२०२५

नुतन प्रशासकिय कार्यालय

कार्यालय

१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८

७०२८०००७८७ pushpakcr@gmail.com www.pushpaksociety.com

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

श्री. व्हि. जी. पवार
मार्गदर्शक
संस्थापक : ज्ञानदीप को. ऑप. क्रे. सोसा.

श्री. गणपतराव पवार
अध्यक्ष

श्री. अर्जुन भोसले
उपाध्यक्ष

संचालक

श्री. परशुराम फडतरे

श्री. अंकुश संकपाळ

श्री. संभाजी पवार

श्री. व्यासदेव पवार

श्री. विनायक तळेकर

श्री. संकेत पवार

सौ. मिनाक्षी ढमाळ

सौ. शशिकला पवार

श्री. श्रीकांत कांबळे

श्री. नारायण कुदळे

श्री. नारायण पालवे

श्री. संतोष पाटणे
तज्ज्ञ संचालक

सौ. शामल फडतरे
तज्ज्ञ संचालिका

श्री. किरण पवार
मुख्यव्यवस्थापक

श्री. उध्दव भोसले
व्यवस्थापक

२७ वा वार्षिक अहवाल २०२४-२०२५

❁ २७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ❁

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **२७** वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२५** रोजी **सकाळी १०.३० वाजता** संस्थेचे अध्यक्ष **मा. श्री. जी. ए. पवार** यांच्या अध्यक्षतेखाली **आर. के. हॉल, हुमा सिनेमा जवळ, स्टेशन रोड, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८** येथे खालील कामकाजासाठी आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

❁ सभेपुढील विषय ❁

१) दि. १६ जून २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षातील संस्थेच्या कामकाजाचा अहवाल नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक सादर करुन त्यास मंजुरी देणे.
३) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) लेखापरिक्षकांकडून आलेल्या सन २०२४-२५ सालचा अहवाल वाचुन नोंद घेणे.
५) सन २०२५-२६ सालासाठी वैधानिक हिशोब तपासणीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६) मागील वर्षी अंदाजपत्रकाप्रमाणे जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२५-२०२६ सालचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
७) सन २०२३-२४ सालच्या वैधानिक लेखापरिक्षकाने दिलेल्या अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
८) कर्ज निर्लेखन प्रस्तावास मान्यता देणे.
९) आर्थिक अडचणीत असलेल्या व संस्थेला सोयीस्कर असलेल्या पतसंस्थेचे आपल्या संस्थेत विलीनीकरण करणेबाबत.
१०) महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ अन्वये संस्थेच्या सन २०२४ ते २०२९ या कालावधीसाठी निवडून आलेल्या सदस्यांच्या नावाची सभेस माहिती देणे.
११) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि. २९ जुलै २०२५ चे पत्रान्वये सुधारीत आदर्श उपविधी दुरुस्तीसह स्वीकारणे.
१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

आपला सहकारी,
अर्जुन ज. भोसले
उपाध्यक्ष
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

स्थळ : मुंबई - ४०० ०७८.
दिनांक : ३० ऑगस्ट २०२५

❁ विशेष सुचना ❁

१) गणसंख्येअभावी तहकुब झालेली सभा पोटनियमातील तरतुदीप्रमाणे त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल व अशा तहकूब झालेल्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.
२) ज्या सभासदांना सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी दिनांक २६ सप्टेंबर २०२५ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात पाठवाव्यात. आयत्या वेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३) संस्थेची वार्षिक अहवालाची प्रत संस्थेची वेबसाईट www.pushpaksociety.com वर उपलब्ध आहे.
४) ज्या सभासदांनी आपला ई-मेल आयडी किंवा मोबाईल क्र. याबाबतची माहिती संस्थेत नोंद केली नसेल त्यांनी आपल्या जवळच्या संस्थेच्या शाखेत किंवा मोबाईल क्र. ७०२८०००७८७ वर सादर करावी.

अध्यक्षांचे मनोगत...

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आज आपल्या संस्थेची २७वी वार्षिक सर्वसाधारण सभा आहे. सन २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षे साजरे करीत असताना संस्थेने ४०० कोटी संमिश्र व्यवसायाचा टप्पा पार केला आहे. बघता-बघता संस्थेला २७ वर्षे पुर्ण झाली. आज आपल्या समोर उभे राहताना मला या संस्थेचा २७ वर्षाचा जीवनपट डोळ्यासमोर दिसत आहे. संस्थेची सुरुवात कशी झाली आणि संस्थेचा उत्तरोत्तर होत जाणारा प्रगतीचा आलेख जसाच्या तसा मी पहात आहे. पण हे श्रेय केवळ माझे एकट्याचे नसुन त्यात आपले सर्व संचालक मंडळ तसेच माझे सर्व कर्मचारी वृंद आणि सर्वात मोठा वाटा म्हणजे आपल्या सारख्या अनेक सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांचा आहे. मी तर म्हणेल सभासद म्हणजे संस्थेचे माय-बाप आहेत, आणि मालक आहेत. आम्ही फक्त तुमच्या हिताचा विचार करुन त्यानुसार पाऊले उचलणारे कार्यकर्ते आहोत. प्रत्येकाच्या जीवनात समस्या ह्या आल्याच आणि समस्या म्हणले की, संस्था ही आठवलीच पाहिजे कारण आम्ही तुमच्या समस्येचे निराकरण करण्यासाठीच तर उभे आहोत. कोणत्याही प्रकारची आर्थिक, सामाजिक समस्येचे उत्तर देणारी एकमेव संस्था म्हणजे आपली "पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि." सभासदांच्या सुखदुःखात सामील होणारी आणि सभासदांना योग्य मार्गदर्शन करणारी, संस्था म्हणून नाव लौकिक प्राप्त झालेली आपली "पुष्पक" संस्था आणि संस्थेचे ब्रीद वाक्यच आहे. "सर्वे सुखीनः संतू" संत तुकाराम महाराजांचे पुष्पक विमान असणारे संस्थेचे मानचिन्ह म्हणजे आपल्या संस्थेची ओळख आहे.

परंतु हेच कार्य करीत असताना अडथळे मात्र अनेक येत आहेत. जसे की कर्जाची वसुली सर्वात मोठा विषय आहे. सभासदांना विनंती आहे की आपण संस्थेप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून वागले पाहिजे. आपण ज्या कर्जदारांना जामीन झालो आहोत तो कर्जदार कर्जाचे हप्ते वेळेवर व नियमित भरत आहे किंवा नाही. भरत नसेल तर त्याला समज देऊन हप्ते भरण्यास प्रवृत्त केले पाहिजे. अन्यथा कर्जदाराबरोबर जामीनदारांना सुद्धा संस्थेने केलेल्या कठोर कारवाईला सामोरे जावे लागत आहे. म्हणून सभासदांना माझी नम्र विनंती आहे की, आपण आपली जबाबदारी ओळखून त्यानुसार वागण्याचा प्रयत्न करावा. संस्था आपली आहे असे आपण म्हणतो परंतु त्यानुसार वागत नाही. सर्वांना मी एकच सांगु इच्छितो की, प्रत्येकाने आपली संस्थेप्रती असणारी जबाबदारी पार पाडावी. असे जर आपण केले तर खरोखरच सहकार क्षेत्रात आपला हात धरणारी दुसरी कोणतीही संस्था नसेल. तुम्ही सांगितलेल्या सुचनांचा नक्कीच विचार केला जाईल.

तसेच नव-नवीन ठेवी व कर्जाच्या योजना कशा प्रकारच्या असाव्यात, त्या योजनांचा लाभ कसा घेता येईल, त्याबद्दल चर्चा करावी. जेणेकरुन काम करताना आम्हाला सुध्दा त्या कामाचा आनंद मिळाला पाहिजे आणि आमचा आनंद म्हणजे सभासदांच्या चेहऱ्यावरचे समाधान आहे. ज्या वेळेत एवादी गोष्ट आम्ही करतो आणि सभासद त्या गोष्टीचा पुरेपूर लाभ घेतात आणि तृप्त होतात तेव्हा आम्हाला सुध्दा आम्ही केलेल्या कामाचे फलित झाले असे वाटते. संस्थेची होणारी प्रगती पाहता असे आवर्जुन सांगावेसे वाटते आहे की आम्ही आजवर केलेल्या कामाचे फलित होत आहे. संस्थेचा शाखा विस्तार वाढतोय म्हणजेच सभासदांनी संस्थेवर दाखविलेला विश्वास आहे. आणि आज पर्यंत हा विश्वासच आम्ही जपण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि यापुढे करीत राहु.

बदलत्या काळानुसार संस्थेने सुध्दा कामकाजात काही बदल घडवून आणले आहेत जसे की Online CBS बँकिंग चा वापर करायला सुरुवात केली आहे. सभासदांना घर बसल्या सेवा पुरवत आहे. एका क्लिक वर आपल्या खात्याची संपूर्ण माहिती सभासदाला मिळत आहे. तसेच पैसे भरण्यासाठी तुम्हाला संस्थेत येणे बंधनकारक नाही. तुम्ही Online पध्दतीने पैसे खात्यावर जमा करु शकता. संस्थेच्या कोणत्याही शाखेत जाऊन व्यवहार करु शकता. अशा प्रकारे एक नाही तर अनेक प्रकारचे बदल संस्थेने घडवून आणलेले आहेत. केवळ आणि केवळ सभासदांसाठी येथे आपल्या संस्थेत लहान असो वा मोठे सर्वांना समजेल अशा सोप्या पध्दतीने व्यवहार होतो आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो पारदर्शक असतो.

आजपर्यंत संस्थेने सभासदांसाठी अनेक प्रकारचे कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न केला आहे. आणि इथून पुढेही असेच वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम हातात घेऊन सभासदांना आनंद देण्याचा एक छोटासा प्रयत्न आम्ही कायम करत राहणार. पण यासाठी तुमचे सहकार्य मात्र अपेक्षित आहे. तुम्ही आम्हाला आतापर्यंत जसे सहकार्य केले तसेच इथून पुढेही कराल अशी मी आशा बाळगतो. काम कितीही मोठे असु द्या परंतु एकमेकांच्या मदती शिवाय ते पूर्ण होत नाही म्हणून मी म्हणतो की, आपण सर्वजण एका साखळी स्वरुपात राहिले पाहिजे तर आणि तरच हे संस्थेचे कार्य असे अविरत चालू राहिल.

हे कार्य करीत असताना सर्व संचालक मंडळाने सुध्दा तितकीच महत्त्वाची भुमिका पार पाडलेली आहे. तसेच माझा सर्व कर्मचारी वृंद, दैनंदिन ठेव प्रतिनिधी आणि संस्थेचे हितचिंतक यांच्या शिवाय मी अपूर्ण आहे. म्हणून मी आपणा सर्वांचे आभार मानतो. मी आपणा सर्वांचा ऋणी आहे. कारण आपल्या सर्वांच्या सहकार्याशिवाय मी काहीही करु शकत नाही.

आपण सर्वजण एकत्र येऊन अजून जोमाने कामाला लागुया आणि संस्थेची उन्नती घडवून आणूया. पुनश्चः आपणा सर्वांचे आभार मानून मी माझे मनोगत पुर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!

।। विना सहकार नाही उध्दार ।।

आपला हितचिंतक,

श्री. गणपतराव आनंदराव पवार

अध्यक्ष

❋ वार्षिक कार्यवृत्तांत ❋

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

संस्थेवर दर्शविलेल्या विश्वासाप्रती व संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीस सदैव पाठिंबा देणाऱ्या भागधारकांचा मी ऋणी आहे. प्रगतीमध्ये सातत्याने सहकार्य करणाऱ्या सभासदांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो. संस्थेला सातत्याने प्रगती पथावर अग्रेसर ठेवण्यास संस्थेच्या सर्व कर्मचारीवृंदांचे लाभत असलेले योगदान देखील आव्हानात्मक परिस्थितीत महत्वाचे ठरते. संस्थेच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असणाऱ्या कर्मचारी वर्गाचे संचालक मंडळाच्या वतीने मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

संस्थेचा सन २०२४-२५ चा २७ वा वार्षिक अहवाल, वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेले ताळेबंद व नफा तोटा पत्रक संचालक मंडळाच्या वतीने सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

संचालक मंडळ :

अहवाल सालात संचालक मंडळाच्या २२ सभा घेण्यात आल्या. या सर्व सभांना संचालकांची उपस्थिती चांगली राहिली. संचालक मंडळाच्या सभेशिवाय इतर सामाजिक कामांमध्ये संचालक सदस्यांचा उत्साहपूर्ण सहभाग होता. अशा प्रकारच्या कळकळीच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगती सतत होत आहे. संचालक मंडळातील सर्व संचालकांच्या सहकार्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

सभासद :

अहवाल वर्षाच्या सुरुवातीस सभासद संख्या १६१५८ होती. यामध्ये प्रत्यक्षात २५७३ नविन सभासदांची नोंद झाली आहे. अहवाल सालात १२२ सभासदांनी राजीनामा दिले आहे. त्यामुळे अहवाल सालाअखेरीस संस्थेचे एकूण सभासद १८६०९ झाले आहेत. सभासदांनी ३१ मार्च २०२५ अखेर जमा असलेला भाग रक्कमेचे दाखले घेवून जावेत. मा. सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्या सुधारित परिपत्रकानुसार एका सभासदाला रु. ५ लाखांपर्यंत भाग खरेदी करता येतील. जास्तीत जास्त भाग खरेदी करुन संस्थेच्या विकासाला हातभार लावावा.

भागभांडवल :

संस्थेचे अहवाल सालच्या सुरुवातीस रु. ६,३३,५६,०००/- एवढे वसुल भागभांडवल होते. अहवाल सालात नवीन सभासद व कर्जदार सभासदांकडून जादा भागभांडवल रु. ४६,०९,८००/- वसुल झाल्याने वाढ झाली आहे. तसेच १२२ सभासदांनी राजीनामा दिल्याने रु. २७,८८,०००/- भागभांडवल कमी होऊन अहवाल सालाअखेर वसुल भागभांडवल रु. ६,५१,७७,८००/- एवढे झाले आहे. भागभांडवलात होणारी वाढ म्हणजेच सभासदांचा संस्थेवरील असलेल्या विश्वासाचे प्रतिक आहे.

राखीव निधी :

गतवर्षीच्या रु. १,६८,७२,८२२/- निधीमध्ये नफ्यातून रु. २४,४४,७७५/- व आर्थिक वर्षात प्रवेश फी नाममात्र सभासद फी रु. २५,७५०/- न घेतलेला लाभांश असे रु. ८३,२१४/- अशी रु. २५,८३,१८१/- ने वाढ होऊन अहवाल सालाअखेर राखीव निधी रु. १,९४,२६,५६१/- झालेला आहे. निधीतील वाढीचे प्रमाण १५.३४% असुन निधीची कायद्यातील तरतुदीनुसार गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेच्या निधीत होणारी वाढ संस्थेचा पाया मजबूत करणारी आहे.

अन्य निधी :

गतवर्षी अन्य निधी रु. ४,७०,७७,७०३/- असुन व्याज रु. २६,००,३९५/- ने वाढ होवून मार्च २०२५ अखेर एकूण अन्य निधी रु. ४,९६,७८,०९८/- झालेला आहे. अन्य निधीतील वाढीचे प्रमाण ५.५२% आहे.

ठेवी :

संस्था देत असलेल्या ग्राहक सेवेमुळे तसेच संचालक मंडळ, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांच्या प्रयत्नाने व तुम्हां सर्वांच्या सहकार्याने संस्थेच्या ठेवीमध्ये भरघोस वाढ झाली आहे. ठेवी मध्ये वाढ करत असताना सभासदांच्या जास्तीत जास्त हिताचा व संस्थेच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन ठेवीला जास्तीत जास्त व्याज देण्याचा संचालक मंडळाने प्रयत्न केलेला आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. १,८५,१०,९२,१६९/- जमा होते. अहवाल सालात ठेवीमध्ये रु. ३३,६१,९२,३५७/- वाढ झाल्यामुळे वर्षअखेरीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये रु. २,१८,७२,८४,५२६/- जमा आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात ठेवीमध्ये १८.१६% वाढ झालेली आहे.

कर्ज :

सभासदांच्या आवश्यकतेनुसार व सुरक्षिततेचा विचार करुन जास्तीत जास्त सभासदांना अर्थ सहाय्य करण्याचा प्रयत्न केला आहे. चालू वर्षात सभासदांना रु. ९१,२५,२०,५८६/- कर्जाचे वाटप केलेले आहे. सहकार क्षेत्रातील स्पर्धा इतर आर्थिक संस्थाचे व्याजदर यामुळे चांगले कर्जदार सभासद संस्थेस सोडून जात आहेत याची दखल घेऊन कर्ज व्याजदरात विविधता आणली आहे. कमी रकमेचे व जास्तीत जास्त सभासदांना कर्ज वाटप करण्यासाठी सतत प्रयत्नशील आहोत.

कर्ज हे संस्थेची मालमत्ता आहे. त्यातूनच संस्थेला उत्पन्न मिळत असते. चांगले कर्जदार मिळणे ही सुध्दा एक स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकाव धरुन संस्थेने चालू वर्षात भरीव कर्ज वितरण करुन कर्जामध्ये गतवर्षीच्या तुलनेत वाढ केलेली आहे. महिला उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने महिलांना वैयक्तिक कर्ज संस्थेच्या शाखा स्तरावर देण्याची योजना चालू केली आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस रु. १,६४,००,२८,१९७/- कर्ज येणे बाकी होते. अहवालसालात रु. ९१,२५,२०,५८६/- कर्ज वितरित केले असुन रु. ६९,३९,६५,८०१/- कर्ज वसुल झालेले आहे. मागील वर्षापेक्षा रु. २१,८५,५४,७८५/- ने कर्जामध्ये वाढ झाली असून वर्षा अखेरीस रु. १,८५,८५,८२,९८२/- कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालात येणे कर्जात १३.३३% वाढ झाली आहे.

थकबाकी व वसुली :

थकबाकी व वसुली सर्वच आर्थिक क्षेत्रा समोरील एक आव्हान आहे. या आव्हानांचा संस्था मुकाबला करुन थकबाकी कमी करण्याचा सतत प्रयत्न केला जात आहे. थकीत कर्जदारांशी थेट चर्चा करुन त्यांच्या आर्थिक स्थितीचा व अडचणीचा विचार करुन मार्ग काढण्यासाठीचा प्रयत्न आहे. मृत झालेल्या कर्जदार सभासदांना व्याज, दंडव्याज व वसुली खर्चात सवलत देऊन एक रकमी भरण्यास सदर खाते थकबाकीतून काढण्याचा सर्वतोपरी प्रयत्न होत आहे. चालू वर्षात थकबाकी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० कलम १०१ नुसार दावे दाखल केले आहेत.

संस्थेने आपली स्वतंत्र कर्ज वसुली यंत्रणा अधिक कार्यक्षम केली आहे. अनुत्पादीत कर्जे मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या संस्थेने आटोकाट प्रयत्न केले आहेत. संस्थेचा स्वतंत्र कर्ज वसुली विभाग ही अनुत्पादित कर्जे कमी करण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसुली अधिकारी व कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदार व त्यांच्या जामिनदारांशी संपर्क साधुन कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

नफा :

आर्थिक क्षेत्रातील स्पर्धात्मक स्थितीत ठेवीवरील व कर्जावरील व्याजदर त्याप्रमाणात ठेवावे लागतात. संस्थेने कर्जामध्ये गुणात्मक वाढ करुन व गुंतवणूकीचे सुयोग्य नियोजन करुन जास्तीत जास्त नफा मिळवण्याचा प्रयत्न केला आहे.

अहवाल सालात निव्वळ नफा रु. १,२३,५५,२०१/- झाला असून त्यात मागील वर्षाचा नफा रु. ४४६/- मिळवून विभागणीसाठी रु. १,२३,५५,६४७/- नफा आहे. सदर नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

राखीव निधी	२५%	३०,८८,९१२/-
लाभांश भाग रक्कम वर प्रमाणात	१०%	६३,३८,०४६/-
सभासद कल्याण निधी		७५,०००/-
इमारत निधी		८,००,०००/-
कर्मचारी कल्याण निधी		५०,०००/-
बुडीत व संशयीत कर्ज निधी		२०,००,०००/-
पुढील वर्षाकरीता शिल्लक		३,६८९/-
एकूण		**१,२३,५५,६४७/-**

लाभांश :

संस्था सभासदाचे हित जोपासताना संस्थेच्या आर्थिक आकडेवारीचा विचार करुन जास्तीत जास्त लाभांश देण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असतो. संचालक मंडळाने जाहीर केलेल्या भाग संकलन ठेव योजनेत अनेक सभासदांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. त्याचबरोबर संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने संचालक मंडळाने सभासदांना चालु वर्षात १०% दराने लाभांश वाटपास मंजुरी दिलेली आहे. आपण त्यास वार्षिक सभेत मंजुरी द्यावी अशी आपणांस विनंती आहे.

खेळते भांडवल :

गतवर्षी संस्थेचे खेळते भांडवल रु. २,११,५५,००,९९६/- होते. त्यात रु. ३३,७०,८१,७२९/- ने वाढ होवून वर्षाअखेरीस खेळते भांडवल रु. २,४५,२५,८२,७२६/- झालेले आहे. अहवाल वर्षात खेळत्या भांडवलातील वाढ १५.९३% इतकी आहे. संस्थेच्या खेळत्या भांडवलामध्ये सातत्याने होणारी वाढ संस्थेची आर्थिक प्रगती दर्शविते.

लेखा परिक्षण :

संस्थेच्या दि. १६/६/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२४-२५ चे वैधानिक लेखा परिक्षण करण्यासाठी अधिकृत लेखापालांच्या सुचीमधून मे. एच. पी. भालेकर ॲन्ड कंपनी (१०९४५-ए-१), सनदी लेखापाल यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यांनी लेखापरिक्षणाचे काम पूर्ण करुन अहवाल सादर केला आहे. संस्थेचे कामकाज व प्रगतीबाबत लेखापरिक्षक यांनी समाधान व्यक्त करुन संस्थेस सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग **अ** देण्यात आला आहे.

कर लेखापरिक्षण (टॅक्स) :

सन २०२३-२४ या अहवालसालाचे कर लेखापरिक्षण मा. श्री. वाय. एस. मुजुमदार आणि कंपनी सनदी लेखापाल मेंबर नं. ३३७०४ यांनी केले असून त्यांनी केलेल्या बहुमोल सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

प्रशिक्षण कार्यशाळा :

अहवाल सालात संस्थेची ध्येय धोरणे ठरवणे. उद्दिष्ट पुर्तीसाठी नियोजन करणे. कर्मचारी यांना अदयावत प्रशिक्षण देणे. यासाठी खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

लोणावळा : संचालक मंडळ धोरणात्मक सभा दि. ११ एप्रिल २०२४ रोजी घेण्यात आली.

खंडाळा : व्यक्तिमत्व विकास, कर्ज वसुली, पतसंस्थाचे कामकाज या विषयी प्रशिक्षण देण्यात आले. संचालक मंडळ व कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा दि. १६ फेब्रुवारी २०२५ ते दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आली.

संस्थेचे मार्गदर्शक व ज्ञानदीप को-ऑप. क्रेडीट सोसायटीचे संस्थापक-संचालक मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब सातत्याने संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचे प्रशिक्षण घेत असतात. त्यांच्या प्रशिक्षणामुळे ठरविलेली उद्दिष्टे पूर्ण झाली याचा आम्हांला आनंद आहे. तसेच मुंबई सहकारी बोर्ड, महाराष्ट्र राज्य बिगरकृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई यांच्या सहकार्याने वेळोवेळी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या. या कार्यक्रमांमध्ये उपस्थितांना मान्यवरांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यामुळे संस्थेच्या प्रगतीस चालना मिळाली.

कर्मचारी :

संस्थेतील अधिकारी तसेच सर्व कर्मचारी यांचेद्वारे अधिकाधिक चांगली ग्राहक सेवा देण्यासाठी, संस्था नेहमीच प्रयत्नशील असते. यावर्षी निरनिराळ्या पध्दतीची सांधिक/व्यक्तीगत उद्दीष्टे दिल्यामुळे शाखांर्तगत अधिकारी-कर्मचारी यांचेसाठी वैयक्तिक स्तरावरही व्यवसाय वृध्दीसाठी उत्साहवर्धक वातावरणात होते. अनेक अधिकारी व कर्मचारी यांनी जोमाने प्रयत्न करुन त्यांची व्यक्तीगत तसेच शाखांसाठीची सामुहिक उद्दिष्टे पूर्ण करण्यात यश मिळवले. त्यांचे हे प्रयत्न अभिमानास पात्र आहेत. संस्थेच्या वाढीबरोबर सभासदांचे संस्थेबद्दलचे प्रेम वृध्दींगत करण्याचे कार्य सर्व कर्मचारी करीत आहेत. दि. ३१ मार्च २०२५ अखेरीस संस्थेच्या सेवेत अधिकारी व कर्मचारी मिळून एकूण ६४ कर्मचारी कार्यरत आहेत.

ठेव प्रतिनिधी :

संस्थेत एकूण १३९ इतके ठेव प्रतिनिधी कार्यरत असून संस्थेस ठेव संकलन करणे. कर्ज वसुलीच्या कामात सहभाग घेणे व संस्थेविषयी प्रचार, प्रसिध्दी करणे अशी महत्वाची कामे त्यांच्याकडून केली जातात. मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या धोरणानुसार प्रत्येक शाखेत किमान १० प्रतिनिधी असावेत. संचालक मंडळ व कर्मचारी यासाठी प्रयत्नशील आहे. इच्छुकांनी स्वयंस्फुर्तीने अशा कामासाठी संस्थेत कार्यरत असावे अशी संचालक मंडळाची अपेक्षा आहे.

सभासद अपघात विमा :

संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. व्ही. जी. पवार साहेब यांच्या संकल्पनेतून संस्थेने आपल्या सर्व सभासदांसाठी व कर्जदारांसाठी न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विमा संरक्षण उपलब्ध करुन दिले आहे. प्रत्येक सभासदांना विनामूल्य रु. १ लाख विमा संरक्षण दिले जाते.

आपला ग्राहक जाणून घ्या :

महाराष्ट्राच्या सहकार विभागाने सभासदांची KYC पूर्ण करण्यासाठी अनेक सुचना लागू केलेल्या आहेत. त्यांचे आपण पालन करीत आहोत. पुर्वीच्या सभासदांनी सुध्दा आपली KYC ची पुर्तता करावी असे आपणांस सुचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर संस्था बरेच व्यवहार सोशल मिडीया मार्फत चालवत आहेत. त्यामुळे आपण आपले अदयावत मोबाईल नं. द्यावेत.

संगणक प्रणाली :

संस्था अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्यासाठी सतत प्रयत्न करीत आहे. या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सभासदांना सुलभ व अचूक सेवा देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. भविष्याचा वेध घेऊन डिजीटल व्यवहार करण्यासाठी सभासदांना मोबाईल ॲप दिला आहे. यासाठी कॉमविझार्ड यांच्याकडून अदयावत संगणक प्रणाली घेण्यात आली असून संस्थेचा सर्व शाखा कोअर बँकींग सोलुशन (सी.बी.एस.) ने जोडण्यात आलेल्या आहेत. यामुळेच सभासदांना कोणत्याही शाखेतून व्यवहार करणे शक्य होत आहे. दैनंदिन ठेव सुध्दा मोबाईल ॲप द्वारे सर्व प्रतिनिधी मार्फत जमा केली जाते.

कोअर बँकिग :

अहवाल वर्षात संस्थेने सभासदांकरीता सुरु केलेल्या विविध डिजीटल सेवांमुळे संस्थेची जनमाणसातील प्रतिमा उंचावली आहे.

१. एस. एम. एस. सुविधा :

संस्थेने एस. एम. एस. सुविधा सुरु करुन सभासदांना खात्यामधील व्यवहाराची माहिती, ठेव मुदतपुर्ती दिनांक, खात्यावरील भरणा केलेली रक्कम, खात्यावरील जमा असलेली रक्कम, कर्ज हप्ता (ईएमआय) सुचना इत्यादी माहिती एस. एम. एस. सुविधेद्वारे देण्यात येते.

२. दैनंदिन ठेव ॲप :

संस्थेची दैनंदिन ठेव ही देखील संस्थेच्या मोबाईल ॲपद्वारे होत असुन त्याचा त्वरीत एस. एम. एस. खातेदाराला जात आहे. त्यामुळे त्यामध्ये देखील अचुकता आली आहे.

३. मोबाईल ॲप :

सभासदांना आपले संस्थेतील खात्यावरील व्यवहार त्वरीत करता यावेत व त्याची माहिती व्हावी याकरीता मोबाईल बँकींग ॲपची सुविधा चालु करण्यात आली आहे. त्यामधुन खातेदारांना त्वरीत व्यवहार करता येणे शक्य होणार आहे. खातेदार आपली रक्कम हस्तांतर, फोन बिल, गॅस बिल, लाईट बिल, टिव्ही रिचार्ज इत्यादी सेवांचा लाभ घेता येणार आहे.

४. आर. टी. जी. एस./एन. ई. एफ. टी. :

या प्रणालीद्वारे ग्राहकांना सशुल्क सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यामुळे खातेदारांची वेळेची व खर्चाची फार मोठी बचत होणार आहे.

५. शाखा कार्यालय शुभारंभ :

संस्थेने अहवाल सालात कामोठे (नवी मुंबई) या ठिकाणी शाखेचा शुभारंभ करण्यात आला.

६. प्रशासकिय कार्यालय खरेदी :

संस्थेच्या प्रशासकिय कार्यालयासाठी "बिझनेस 78" कॉम्पलेक्स, हुमा सिनेमाजवळ, स्टेशन रोड, कांजुरमार्ग (प.), मुंबई-७८ येथे प्रशस्त अशी ९४० चौरस फुटाची स्वमालकीची जागा खरेदी करण्यात आली.

श्रध्दांजली :

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात व्यक्तींना संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हि ईश्वरचरणी प्रार्थना.

आभार :

संस्थेला सहकार क्षेत्रात नावलौकीक प्राप्त करुन देण्यासाठी सतत कार्यरत असणाऱ्या ठेव प्रतिनिधी, संचालक मंडळ व सभासद वर्ग यांचे मी मन:पुर्वक अभिनंदन करतो.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकारमंत्री, सर्व राज्यमंत्री, मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे व त्यांचे सर्व अधिकारी वर्ग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुर्व उपनगरे (२), कोकण भवन, नवी मुंबई, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, त्यांचे सर्व अधिकारी तसेच मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था 'एस' विभाग, कोकण भवन, त्यांचे सर्व सहकारी, अधिकारी संस्था कार्यक्षेत्रातील सहकार खात्याचे विविध पदाधिकारी यांची संस्था ऋणी आहे. तसेच कामकाजास विशेष मदत करणारे मा. जिल्हाधिकारी, तहसीलदार, पोलिस निरीक्षक व त्यांचे सर्व अधिकारी, कर्मचारी यांची संस्था ऋणी आहे.

मा. आ. प्रविण दरेकर - अध्यक्ष मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक, मा. शिवाजीराव नलावडे - अध्यक्ष बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन, सर्व सहकारी संचालक, मा. श्री. जे. एस. पवार - महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मा. अंकुश जाधव - संपादक पतसंस्था व्यवस्थापन डायरी, मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, ज्ञानदिप को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., डीएमके जावली सहकारी बँक लि., मुंबई सहकारी बोर्ड तसेच संस्थेशी संलग्न असलेल्या सहकारी पतसंस्थाचे, सहकारी बँकाचे अध्यक्ष, पदाधिकारी व संचालक मंडळ यांची संस्था ऋणी आहे.

संस्थेचे कायदेविषयक सल्लागार, मालमत्ता व सोने यांचे मुल्यांकन करणारे व्हॅल्युअर, अंतर्गत हिशोब तपासनीस, वैधानिक लेखा परिक्षक यांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल संस्था ऋणी आहे. संस्थेचे संगणक प्रणाली विकासक, मे. कॉमविझार्ड प्रणालीचे प्रदिप भाटीया व युसुफ सर यांचे सर्व कर्मचारी यांची संस्था ऋणी आहे.

एका अभिमानास्पद वळणावरुन संस्थेच्या प्रगतीचा प्रवास सुरु आहे. नव्या जबाबदाऱ्या, नवीन आकांक्षा, नवीन अपेक्षा, नव्या स्वप्नांच्या क्षितीजाकडे झेपावत असताना आपणां सर्वाच्या सहकार्याची अपेक्षा ठेवून हा अहवाल पूर्ण करीत आहे.

आपला विनम्र,

गणपतराव आनंदराव पवार

अध्यक्ष

❊ परिशिष्ट - अ ❊

संस्थेचे नांव	:	**पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**
कार्यालय पत्ता	:	१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल. बी. एस. मार्ग, कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८.
नोंदणी दिनांक	:	३१/१२/१९९८
नोंदणी क्रमांक	:	BOM/WS/RSR/CR/८३७४/१९९८
कार्यक्षेत्र	:	बृहन्मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, सातारा, नगर जिल्ह्यापुरते.
सभासद संख्या	:	१८६०९
अधिकृत भाग भांडवल	:	१०,००,००,०००/-
वसुल भाग भांडवल	:	६,५१,७७,८००/-
राखीव व इतर निधी	:	६,९२,१७,८५९/-
ठेवी	:	२,१८,७२,८४,५२६/-
गुंतवणूका	:	३९,६८,६९,११७/-
कर्जे	:	१,८५,८५,८२,९८२/-
सी. डी. रेशो	:	७५.०१%
अहवाल वर्षात निव्वळ नफा	:	१,२३,५५,२०१/-
ऑडीट वर्ग	:	अ
खेळते भांडवल	:	२,४५,२५,८२,७२६/-
शाखा	:	१७ + १ मुख्यालय
कर्मचारी संख्या	:	६४
ठेव प्रतिनिधी	:	१३९
संमिश्र व्यवसाय	:	४०४.५८ कोटी

BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2025

31/03/2024	Liabilities	Amount	31/03/2025
	Authorised Share Capital अधिकृत भाग भांडवल		**10,00,00,000.00**
6,33,56,000.00	Paid up Share Capital वसुल भाग भांडवल	6,33,56,000.00	
	Add - Rec. During the year अधिक अहवालसाली जमा	46,09,800.00	
	Less - Refund During the year अहवालसाली परत	2,78,800.00	6,51,77,800.00
	Reserve & Other Funds राखीव व इतर निधी		
1,68,43,380.00	Reserve Fund राखीव निधी	1,94,00,811.00	
28,280.00	Enterance Fee प्रवेश फी	25,730.00	
1,162.00	B Class Member नाममात्र सभासद	20.00	1,94,26,561.00
1,73,27,130.00	Reserve for Bad & Doubtful Debts बुडीत कर्ज निधी	1,83,57,755.00	
2,45,76,931.00	Building Fund इमारत निधी	2,61,26,181.00	
5,12,491.00	Member Welfare Fund सभासद कल्याण निधी	5,62,491.00	
7,77,620.00	Staff Welfare Fund कर्मचारी कल्याण निधी	8,02,620.00	
3,43,531.00	Charitable Fund धर्मदाय निधी	3,61,551.00	
35,40,000.00	Standard Assets Prov. उत्पादीत कर्ज तरतूद	35,80,700.00	4,97,91,298.00
	Deposits ठेवी		
9,82,57,050.00	Daily Deposits दैनंदिन ठेव	12,09,12,623.00	
6,58,75,085.00	Saving Deposits बचत ठेव	8,00,47,794.00	
2,42,01,613.00	Recurring Deposits आवर्त ठेव	2,72,19,960.00	
43,39,34,014.00	Fixed Deposits मुदत ठेव	53,14,55,267.00	
4,09,03,831.00	Double/Bonus Deposits दामदुप्पट/बोनस ठेव	4,34,30,952.00	
2,55,950.00	Agent Security Deposits प्रतिनिधी सुरक्षा ठेव	2,82,950.00	
32,75,30,965.00	Monthly Interest Deposits मासिक व्याज ठेव	33,92,08,775.00	
63,81,22,102.00	Shubarambh Deposits शुभारंभ ठेव	62,95,53,563.00	
15,87,21,376.00	Short Term Deposits अल्प मुदत ठेव	11,61,33,306.00	
87,36,128.00	Pushpanand Deposits पुष्पानंद ठेव	75,94,493.00	
22,28,149.00	Loan/Staff Security Deposits कर्ज सुरक्षा ठेव	26,95,662.00	
1,10,88,695.00	Lakpati Deposits लखपती ठेव	89,28,802.00	
3,24,750.00	Suvarna/Vidhyut Pushpa Deposits सुवर्ण/विद्युत पुष्प ठेव	74,000.00	
37,62,180.00	Pushpasamruddhi Deposits पुष्प समृध्दी ठेव	38,66,622.00	
3,10,000.00	Viman Pushpa Deposits विमान पुष्प ठेव	1,85,000.00	
3,68,40,281.00	Pratham Deposits प्रथम ठेव	27,56,94,757.00	2,18,72,84,526.00
8,62,79,277.00	**Borrowings** बँक ओडी खाते		7,74,88,834.00
	Other Liabilities इतर देणी व तरतुदी		
2,965.00	Surcharge Account सरचार्ज खाते	18,115.00	
10,000.00	Professional Tax (PT) व्यवसाय कर	11,000.00	
14,550.00	Insurance & Development Fund विकास निधी	39,759.00	
33,894.00	Tax Deducted at Source टी. डी. एस. खाते	1,43,445.00	
10,17,000.00	Audit Fee Payable ऑडीट फी देय	11,67,000.00	
1,96,868.00	Employees P. F. Contribution कर्मचारी पी. एफ.	2,18,860.00	
---	Earnest Money Khandala खंडाळा	2,50,000.00	18,48,179.00
36,17,827.00	Unclaimed Dividend न घेतलेला लाभांश		36,87,962.00
3,61,50,823.00	**Interest Payable** ठेवीवरील देणे व्याज		3,55,21,919.00
	P & L Appropration A/c नफा तोटा खाते	446.00	
97,79,099.00	Add : Current year profit अधिक चालू वर्षाचा नफा	1,23,55,201.00	1,23,55,647.00
2,11,55,00,997.00	**Total**		**2,45,25,82,726.00**

M/s. H. P. Bhalekar & Co. (Chartered Accountant)

BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2025

31/03/2024	Assets	Amount	31/03/2025
	Cash & Bank Balance रोख व बँक शिल्लक		
81,35,214.00	Cash in Hand रोख शिल्लक	76,96,968.00	
77,87,908.00	Cash at Bank बँक शिल्लक	1,45,91,197.00	2,22,88,165.00
	Investments गुंतवणूक		
5,85,89,473.00	F.D. at M.D.C. Bank मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक	11,44,43,257.00	
9,19,30,631.00	F.D. at Jaoli/Satara Bank मुदत ठेव जावली/सातारा बँक	15,75,50,897.00	
7,40,30,925.00	F.D. at Sopan Bank मुदत ठेव सोपान बँक	6,34,88,364.00	
40,83,661.00	F.D. at Saraswat Bank मुदत ठेव सारस्वत बँक	1,52,43,199.00	
5,89,30,441.00	F.D. with Society मुदत ठेव सोसायटी	2,44,89,223.00	
1,72,06,492.00	F.D. at M.D.C.C. Bank (R/F) मुदत ठेव जिल्हा मध्य. बँक	2,07,02,677.00	
9,21,000.00	Share with M.D.C. Bank भाग मुंबै बँक	9,21,000.00	
10,000.00	Share with K.S.S.K. Ltd. भाग साखर कारखाना	10,000.00	
1,000.00	Share with M.R.S.P. Fed. भाग महा. पतसंस्था फेडेरेशन	1,000.00	
9,500.00	Share with P.U.Z.P. Fed. भाग पूर्व उपनगरे फेडेरेशन	9,500.00	
10,000.00	Share with D.G.C. Ltd. भाग डी.जी.सी. लि.	10,000.00	39,68,69,117.00
	Security Deposits सुरक्षा अनामत		
13,320.00	Telephone Deposits टेलिफोन अनामत	13,320.00	
17,725.00	Electricity Deposits विज अनामत	17,725.00	
2,10,39,953.00	Office Building कार्यालय इमारत	2,98,35,239.00	
2,23,02,100.00	Building Security Depo. इमारत अनामत	2,23,02,100.00	
5,000.00	Security Depo. at BEST बी.ई.एस.टी. अनामत	5,000.00	
5,10,000.00	Office Deposits कार्यालय अनामत	5,10,000.00	
6,80,927.00	Security Depo. at Msed महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रीक बोर्ड	6,85,427.00	5,33,68,811.00
	Fixed Assets कायम स्वरुपी मालमत्ता		
82,798.00	Air Condition ए. सी.	62,099.00	
57,82,173.00	Furniture & Fixture फर्निचर व फिक्चर	84,41,289.00	
35,36,361.00	Computer Equipments संगणक	49,89,509.00	
1,17,562.00	Daily Collection Machine दै. कलेक्शन मशीन	3,13,913.00	
90,750.00	Vehicle Motor Cycle मोटर सायकल	68,063.00	1,38,74,873.00
	Loan कर्ज		
3,05,89,575.00	Personal Loan वैयक्तिक कर्ज	3,81,88,210.00	
2,00,71,572.00	Daily Personal Loan दै. ठेव वैयक्तिक कर्ज	2,44,43,798.00	
23,37,23,394.00	Group Personal Loan गट वैयक्तिक कर्ज	26,69,17,605.00	
4,72,77,754.00	Vehicle Loan वाहन कर्ज	4,08,71,517.00	
85,19,06,063.00	Business Loan व्यवसाय कर्ज	87,31,75,575.00	
14,80,95,938.00	Against Depo. Loan ठेव तारण कर्ज	17,90,44,070.00	
5,21,60,008.00	Security Personal Loan सुरक्षित वैयक्तिक कर्ज	3,97,56,340.00	
19,02,74,369.00	Arbitration Loan लवादी कर्ज	31,03,73,229.00	
18,75,352.00	Staff Vehicle Loan कर्मचारी वाहन कर्ज	16,78,683.00	
75,16,434.00	Staff Personal Loan कर्मचारी वैयक्तिक कर्ज	74,76,127.00	
3,85,24,087.00	Staff Housing Loan कर्मचारी गृहतारण कर्ज	5,33,53,847.00	
1,31,73,205.00	Gold Loan सोने तारण	1,67,30,223.00	
48,40,446.00	Agent Personal Loan एजंट वैयक्तिक कर्ज	65,73,758.00	1,85,85,82,982.00
8,19,11,976.00	**Int. Receivable** व्याज येणे		7,90,92,459.00
	Other Assets इतर मालमत्ता		
1,31,22,720.00	Office Primises Advance ऑफिस प्रिमायसेस ॲडव्हान्स	2,39,71,360.00	
25,020.00	Adheshive Stamps अधेसिव्ह स्टॅम्प	32,190.00	
34,33,187.00	T.D.S. Receivable टी.डी.एस.	34,86,103.00	
11,54,983.00	Sainath Credit Society साईनाथ क्रे. सोसा.	10,14,916.00	
—	Advertisement जाहिरात	1,750.00	2,85,06,319.00
2,11,55,00,997.00	**Total**		**2,45,25,82,726.00**

Arjun J. Bhosale (Vice-Chairman) **G. A. Pawar** (Chairman)

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2025

31/03/2024	Expenditure	Amount	31/03/2025
14,52,37,968.00	**Interest on Deposits** ठेवीवरील व्याज		17,81,32,633.00
51,92,893.00	**Interest on Bank Loan** बँक कर्जावरील व्याज		66,83,632.00
2,17,35,425.00	Salary पगार	2,46,68,796.00	
13,46,288.00	Stipend विद्यावेतन	3,92,638.00	
7,39,460.00	Bonus & Emp. Gratuity बोनस व कर्मचारी ग्रॅज्युटी	11,74,001.00	
22,39,998.00	Employee P. F. Exp. कर्मचारी पी. एफ. खर्च	27,59,587.00	2,89,95,022.00
1,67,896.00	Postage & Telegram पोस्टेज व टेलिग्राम	1,63,992.00	
8,82,399.00	Rents कार्यालय भाडे	10,19,157.00	
2,70,744.00	Travelling Exp. प्रवास खर्च	3,82,325.00	
3,94,618.00	Electricity Exp. वीज खर्च	4,37,489.00	
9,90,930.00	Insurance Exp. विमा खर्च	12,59,520.00	
2,73,975.00	Repair & Maintance दुरुस्ती खर्च	2,00,976.00	
1,59,937.00	Annual Maintanance Exp. वार्षिक देखभाल खर्च	2,96,903.00	
2,63,336.00	GST Exp. जी. एस. टी. खर्च	4,880.00	
3,95,736.00	Misc. Exp. किरकोळ खर्च	3,15,396.00	
13,470.00	News Paper वर्तमान पत्र	17,898.00	
5,06,168.00	Printing & Stationary छपाई स्टेशनरी खर्च	4,94,825.00	
1,00,213.00	Pooja Exp. पूजा खर्च	1,38,074.00	
2,21,079.00	Telephone Exp. टेलिफोन खर्च	1,95,004.00	
58,09,254.00	Commission Exp. कमिशन खर्च	68,92,893.00	
2,560.00	Legal Fees कायदेशीर शुल्क	10,630.00	
11,19,398.00	Loan Recovery Charges कर्ज वसुली खर्च	11,10,852.00	
67,433.00	Bank Charges बँक चार्जेस	88,349.00	
12,62,056.00	Audit Exp. लेखापरिक्षण फी	14,05,226.00	
1,24,535.00	Advertisement जाहिरात	43,801.00	
1,63,560.00	Professional Charges व्यवसाय खर्च	1,50,600.00	
5,48,134.00	Entertainment Exp. चहापान खर्च	5,51,927.00	
79,920.00	A. G. M. Exp. वार्षिक सभा खर्च	81,344.00	
12,72,293.00	Silver Jubilee Exp. सिल्वर ज्युबिली खर्च	---	
10,87,660.00	Recovery Charges वसुली खर्च	14,57,375.00	
8,620.00	Licence Fee परवाना शुल्क	---	
1,81,850.00	Cleaning Exp. साफसफाई खर्च	2,07,409.00	
99,094.00	Water Exp. पाणी बिल	59,735.00	
1,57,649.00	Training Exp. प्रशिक्षण खर्च	1,70,016.00	
70,500.00	Meeting Exp. सभा खर्च	1,17,094.00	
54,292.00	Branch Opening Exp. शाखा खर्च	88,874.00	
---	Election Exp. निवडणूक खर्च	87,816.00	
1,250.00	Subscription सदस्यता	1,250.00	
5,00,000.00	Pro For RBDD आरबीडीडी	1,00,000.00	
38,547.00	T.D.S. Exp. (Mseb) टॅक्स	40,611.00	1,75,92,241.00
18,70,214.00	**Deprication** घसारा		8,98,206.00
97,76,633.00	**Profit & Loss A/c** नफा तोटा खाते		1,23,55,201.00
20,54,27,985.00	**Total**		**24,46,56,935.00**

M/s. H. P. Bhalekar & Co. (Chartered Accountant)

PROFIT & LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2025

31/03/2024	Income	Amount	31/03/2025
2,10,49,311.00	Interest on Bank Deposit ठेवीवरील व्याज	2,54,57,129.00	
18,08,70,547.00	Interest on Loan कर्जावरील व्याज	21,62,17,387.00	24,16,74,516.00
16,68,557.00	Misc. Income किरकोळ जमा	16,03,569.00	
2,31,059.00	M.s.e.d. Commission एम. एस. ई. डी. कमिशन	1,93,860.00	
15,62,556.00	Processing Charges सर्व्हिस चार्ज	11,84,990.00	
45,955.00	Dividend on M.D.C. Bank लाभांश मुंबै बँक	—	29,82,419.00
20,54,27,985.00	**Total**		**24,46,56,935.00**

Arjun J. Bhosale (Vice-Chairman) **G. A. Pawar** (Chairman)

अंदाजपत्रक २०२५-२६

भांडवल व देणी	अंदाज सन २४/२५	प्रत्यक्ष सन २४/२५	अंदाज सन २५/२६	मालमत्ता व येणी	अंदाज सन २४/२५	प्रत्यक्ष सन २४/२५	अंदाज सन २५/२६
वसुल भाग भांडवल	७०९५८७२०	६५१७७८००	७२९९९१३६	रोख व बँक शिल्लक	११९०३१०२	२२२८८१६५	२७८६०२०६
राखीव व इतर निधी	७३५४३१०४	६९२१७८५९	७९४७०३५७	गुंतवणुक	४०६६११७५४	३९६८६९११७	५२७८३५१२६
सभासद ठेवी	२२८६०९८८२९	२१८७२८४५२६	२६९२५४७२५२	सभासद कर्ज	२०००८३४४००	१८५८५८२९८२	२२६७४७१२३८
ठेवीवरील व्याज तरतुद	४१२१११३८	३५५२१९१९	४०४१४९८७	कायम व इतर मालमत्ता	१०५७०६०८	१३८७४८७३	१५२५२३६०
इतर येणी व तरतुदी	९२६७०१४५	७९३३७०१३	८३४२२७२४	सुरक्षा अनामत/कार्यालय	४९०२५९२८	५३३६८८११	५८७०५६९२
लाभांश देणे बाकी	४०५११९६६	३६८७९६२	४०१३६३८	ठेवीवरील येणे व्याज	८९२८४०५४	७९०९२४५९	८६२१२६८८
एकूण नफा	११२४५९६४	१२३५५६४७	१४२०८९९४	इतर येणी	३५५००२०	२८५०६३१९	३८८८९७८
एकूण	**२५७९७८०६६६**	**२४५२५८२७२६**	**२९८७२३७०८८**	**एकूण**	**२५७९७८०६६६**	**२४५२५८२७२६**	**२९८७२३७०८८**

खर्च तपशील	अंदाज सन २४/२५	प्रत्यक्ष सन २४/२५	अंदाज सन २५/२६	जमा तपशील	अंदाज सन २४/२५	प्रत्यक्ष सन २४/२५	अंदाज सन २५/२६
ठेवीवरील व्याज	१६७०२३६६३	१७८१३२६३३	२०४८५२५२८	कर्जावरील व्याज	२०८००११२९	२१६२१७३८७	२४८६४९९९५
बँक कर्ज व्याज	५९७१८२७	६६८३६३२	७६८६१७७	इतर उत्पन्न	३९८१४९८	२९८२४१९	३४२९७८२
पगार व इतर भत्ते	२१९७०३४७	२८९९५०२२	३३३४४२७५	बँक लाभांश	४८२५३	०	०
प्रशासकीय खर्च	११९६८५५१	१७५९२२४१	२०२७५४७५	गुंतवणुकीवरील व्याज	२४२०६७०८	२५४५७१२९	२९२७५६९८
तरतुदी व इतर खर्च	२०५७२३५	८९८२०६	९८८०२७				
नफा	११२४५९६४	१२३५५२०१	१४२०८९९४				
एकूण	**२३६२३७५८७**	**२४४६५६९३५**	**२८१३५५४७५**	**एकूण**	**२३६२३७५८७**	**२४४६५६९३५**	**२८१३५५४७५**

नमुना 'एन-२'

(कलम ८१ आणि नियम ६९ (३) नुसार)

प्रति,
अध्यक्ष
पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
१५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग,
कांजुरमार्ग (प.), मुंबई - ४०० ०७८.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैद्यानिक लेखापरिक्षण अभिप्राय :

१. पुष्पक को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई या संस्थेचे दि. १/४/२०२४ ते ३१/३/२०२५ या वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरिक्षण केलेले असून, त्यामध्ये दि. १/४/२०२४ ते ३१/३/२०२५ या दिनांकाचा ताळेबंद व त्या दिनांकास संपणारे नफा-तोटा पत्रक आणि त्यात समाविष्ट केलेल्या हिशोबांच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेले नियमान्वये आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चुक यामुळे होणाऱ्या लक्षनीय चुकांपासून मुक्त राहतील, अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

लेखापरिक्षकांची जबाबदारी :

३. आर्थिक पत्रके बनविणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागू असलेले मान दंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरुन केलेली आहे. ह्या मापदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची अकानी व अमंलबजावणी अशा प्रकारे करावी की ज्या येणे हिशोबात लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण अशी खात्री पटेल.

४. लेखापरिक्षणामध्ये उघड न झालेले दोष आणि रक्कम यातील पुरावा जमा करण्याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनीयोजनेच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरिक्षणामध्ये जमा खर्चाच्या मुल्यांकनाच्या विनीयोजनेचा वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्रकांचे सादरीकरण याचा समावेश आहे.

५. आमच्या लेखापरिक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

अभिप्राय :

६. आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेली टिपणी व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६०, नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थासाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.
१. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/३/२०२५ ची स्थिती आणि
२. नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरिक्षण अहवाल भाग अ, ब आणि क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

इतर कायदेशीर व नियमावली संदर्भात अभिप्राय :

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तयार करण्यात आलेली आहेत.

मी अहवाल करतो की :

८. अ. लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीनुसार व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते पुरेसे आहेत.
ब. आमच्या तपासणीतून जीतपत दृष्टीपत्तीस येईल त्यावरुन संस्थेने कायद्यानुसार आवश्यक ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.
क. संस्थेच्या शाखांचे हिशोबाची तपासणी करुन आलेले शाखा लेखापरिक्षकांचे अहवाल हे आमचा लेखापरिक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.
ड. संस्थेस चालू तपासणी कालावधी सन २०२४-२५ या वर्षासाठी लेखापरिक्षण वर्ग 'अ' देण्यात आलेला आहे.

सही,
मे. एच. पी. भालेकर ॲन्ड कंपनी
सनदी लेखापाल
सहकारी संस्था, पॅनल क्र. १०९४५-ए-१

विषय : मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. २९/०७/२०२५ चे पत्रान्वये सुधारीत आदर्श उपविधी दुरुस्तीसह स्विकारणे.

राज्यातील नागरी / ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतसंस्थांना सुधारीत **"आदर्श उपविधी"** लागू करण्यास मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे संस्थेने केलेल्या दुरुस्त्या खालीलप्रमाणे.

उपविधी क्रमांक	सध्या अस्तित्वात असलेला नियम	करावयाची दुरुस्ती/समावेश	दुरुस्तीचे कारण
१ ते ६७	आदर्श उपविधी उपविधी क्र. १ ते ६७	मा. सहकार आयुक्त यांनी दिनांक २९/०७/२०२५ च्या पत्रान्वये सुधारीत आदर्श उपविधी लागू करण्यास मान्यता दिल्याने करावयाचे आवश्यक बदल उपविधी क्र. १ ते ७२	मा. सहकार आयुक्त यांनी दिनांक २९/०७/२०२५ च्या पत्रान्वये सुधारीत आदर्श उपविधी लागू करण्यास मान्यता दिल्याने उपविधीमध्ये बदल करणे आवश्यक आहे.

❊ पुष्पक प्रगती अहवाल ❊

तपशील	मार्च २०२०	मार्च २०२१	मार्च २०२२	मार्च २०२३	मार्च २०२४	मार्च २०२५
सभासद	८३७३	९५७३	११३४०	१३५२१	१६१५८	१८६०९
वसुल भाग भांडवल	४२४४५६००	४५२०७८००	४६०५८७००	५९४१४९००	६३३५६०००	६५१७७८००
राखीव व इतर निधी	४४४३९००७	४७३२४६६७	४८८००८२४	५५६२४५५९	६३९५०५२५	६९१०४६५९
एकूण ठेव	१०३७६१०५७७	१०८७४८४४०१	१२४५५५१२४७	१४६६९८७५५१	१८५१०९२१६९	२१८७२८४५२६
कर्ज येणे	१०२४७५६८७२	१०७७१२८९१३	११९९००४२४१	१३५४३६५६२४	१६४००२८१९७	१८५८५८२१९२
गुंतवणूक	२०५७१२४८३	२१७८१८०८०	२४२७७९९०५	२९५२७७१२७	३०५७२३१२३	३९६८६९११७
निव्वळ नफा	५९९४९४८	४६९००८२	७६४८४८८	८८६६७९७	९७७६६३३	१२३५५२०१
लाभांश	१०%	८%	८%	१०%	१०%	१०% *
खेळते भांडवल	१३२०२८३०२७	१३८९८७४९६४	१५४३५५६४५३	१७७११४५३४७	२११५५००९९६	२४५२५८२७२६
ऑडिट वर्ग	अ	अ	अ	अ	अ	अ
कर्मचारी व प्रतिनिधी	१२०	११९	११३	१५२	१५७	२०३

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

संस्थेच्या कामोठे (नवी मुंबई) शाखेचा उद्‌घाटन समारंभ

संस्थेच्या सर्व सभासदांना मोफत अपघाती विमा संरक्षण देण्यात येते याद्वारे धनादेश प्रदान करताना.

दिनदर्शिका २०२५ प्रकाशन

कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळा

राज्यसभेचे नवनिर्वाचित खासदार मा. श्री. नितीन काका पाटील यांचे अभिनंदन करताना संस्थेचे अध्यक्ष, मा. अध्यक्ष व उपाध्यक्ष

मा. श्री. अजयकुमार भालके साहेब सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पूर्व उपनगरे कोकण भवन यांची मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट.

श्री तीर्थक्षेत्र सोळा शिवलिंग शनैश्वर देवस्थान चॅरिटेबल ट्रस्ट, सोळशी ता. कोरेगांव येथे सेवा कार्यक्रम प्रसंगी.

संस्थेची शाखा कार्यालये

कांजुरमार्ग	७०२८०००७०१	चेंबूर	७०२८०००७०२
मुलूंड	७०२८०००७०३	जुईनगर	७०२८०००७०४
लोणंद	७०२८०००७०५	ठाणे	७०२८०००७०६
साकीनाका	७०२८०००७०७	सातारा	७०२८०००७०८
खंडाळा	७०२८०००७०९	काळेवाडी पुणे	७०२८०००७१५
नायगांव (वसई)	७०२८०००७१६	वाई	७०२८०००७१९
परेल	७०२८०००७५५	विंग (सातारा)	७०२८०००७७१
नऱ्हे (पुणे)	७०२८०००७२६	कामोठे	७०२८०००७७६
धनकवडी	७०२८०००७३२	कोपरखैरणे	९८७०८१३०२७

Matoshree Design : 9082204814

पुष्पक
को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

प्रशासकीय कार्यालय : १५, लक्ष्मी उद्योग नगर, एल.बी.एस. मार्ग,
कांजुरमार्ग (प.), मुंबई - ७८ ☎ ०२२ २५७८ ०२३६ / ७०२८०००७८७
www.pushpaksociety.com pushpakcr@gmail.com

बुक - पोष्ट

प्रति,
श्री./श्रीमती ____________________

____

____